**F.Y.B.A.(Sem- II) (March-2023)**

**Marathi Compulsory - II**

**Q.P. Code:00000032**

[वेळ: ३ तास] [ गुण:१०० ]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**

**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**

**३. प्रश्नांसामोरील अंक गुण दर्शवतात.**

**प्र.१** अ. 'दुसऱ्यावेळी पास झालो' या शीर्षकांतर्गत आलेल्या म. गांधी यांच्या जीवनानुभवातील पारदर्शकतेचे स्वरूप स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

ब. सी. रामचंद्र यांची शालेय जीवनात शून्य प्रगती असली तरी संगीत, अभिनय आणि चित्रपट जगतातील यशाची गोष्ट 'सरगम' या आत्मचित्रणपर मांडणीद्वारे रेखाटा.

**प्र.२** अ. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या वक्तृत्वाचा विकास ‘शब्दाचे मोल’ या लेखनाधारे स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

ब. 'नापास मुलांची गोष्ट' या ललित लेखसंग्रहातील प्रेरणासूत्राचे स्वरूप साधार स्पष्ट करा.

**प्र.३** टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)** **(१०)**

अ. कुसुमाग्रजांचे काव्यप्रेम

ब. ना. सी. फडके यांचा स्पष्टवक्तेपणा

क. यशवंतराव गडाख यांचे शालेय जीवनानुभव

ड. वाय सी. पवार यांचे महाविद्यालयीन जीवन

**प्र.४** अ. अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरूप सांगून तिच्या लेखनपद्धतीचे स्वरूप स्पष्ट करा. **(१०)**

**किंवा**

ब. वृत्तांतात्मक इतिवृत्तलेखनाच्या विषय आणि उद्देशांची सविस्तर चर्चा करा.

**प्र.५** अ. जाहिरातींच्या मूलभूत उद्देशांसह जाहिरातींच्या विविध प्रसिद्धी माध्यमांविषयी विस्ताराने लिहा. **(१०)**

**किंवा**

ब. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त असलेल्या इस्पितळाची मुद्रित माध्यमासाठी जाहिरात तयार करा

प्र.६ पुढील **उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा**. (१०)

जपानी लोक बोलण्यात अतिशय मृदू, वागण्यात अत्यंत नम्र आणि कृती करण्यात सर्वात तत्पर असतात. हे लोक आपापल्या उद्योगात, व्यापारात, कारखान्यात काम करताना पाहिले तर करारीपणा, चिवटपणा आणि उद्योगप्रियता या त्यांच्या गुणांची आपल्यावर छाप पडते. ते अत्यंत कडक शिस्तीचे आणि नियमितपणाचे भोक्ते आहेत. अमेरिकन आणि जर्मन तज्ज्ञांनी व्यवस्थापनाचे जे तत्त्व मांडले आहे, ते सर्व गुंडाळून ठेवून जपान्यांनी स्वतःचे अर्थशास्त्र आणि त्याला अनुरूप असे स्वतःचे व्यवस्थापनशास्त्र तयार केले ते परखडपणे आचरणात आणले आणि जगाला औद्योगिक चमत्कार करून दाखवले अलीकडेच जपानने फिल्मशिवाय फोटो काढणारा कॅमेरा तयार केला आहे. छायाचित्रणातील हा अत्यंत महत्त्वाचा शोध असून, कॅमेऱ्यासाठी फिल्म तयार करणाऱ्या उद्योगात त्यामुळे प्रचंड उलथापालथ होईल. माविका असे या नव्या कॅमेऱ्याचे नावा असून, सोनी या जगप्रसिद्ध इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने तो शोधून काढला आहे. याच कंपनीने पहिला ट्रान्झिस्टर तयार केला होता आणि खिशात ठेवण्यासारखा टी.व्ही. याच सोनी कंपनीने तयार केला आहे.

अ. जापनी लोकांच्या कोणकोणत्या गुणांचा उल्लेख उताऱ्यात केला आहे?

ब. जपानी लोकांनी औद्योगिक चमत्कार साधण्यासाठी काय केले?

क. फिल्मशिवाय फोटो काढणारा कॅमेरा कोणत्या कंपनीने तयार केला व त्याचे नाव काय?

ड. सोनी कंपनीच्या कोणत्या तीन निर्मितीचा उल्लेख या उताऱ्यात केला आहे?

इ. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

प्र.७ खालील उताऱ्याचे **सारांशलेखन** करा. (१०)

व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर अद्याप का होऊ शकत नाही आणि तो वापर करावयाचा झाल्यास मराठी भाषा ही अर्थव्यवहारात आणि वाणिज्य क्षेत्रात कितपत सुलभतेने वापरता येईल ह्या प्रश्नासंबंधी अजूनही विवेचन करण्याची वेळ आपल्यावर येते. जगात औद्योगिकदृष्ट्या जे समृद्ध आणि प्रगत झालेले देश आहेत त्या देशांमध्ये त्या त्या लोकांची मातृभाषा अभिमानाने आणि सुलभतेने औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात वापरली जाते. आणि त्यामुळे साहजिकच विश्वविद्यालयीन क्षेत्रात वाणिज्य आणि औद्योगिक विद्याशाखांमधून त्या त्या देशातील मातृभाषेचा सुलभतेने आणि आवर्जून वापर केला जातो. पश्चिम जर्मनी आणि जपान या दोन

औद्योगिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशांचे ठळक उदाहरण याबाबत घेता येईल. जपानमधील औद्योगिक व्यवहाराची पाहाणी करण्याकरिता गेलेल्या एका संशोधकाला तेथील अधिकाऱ्यांशी आणि कामगारांशी इंग्रजीतून बोलणे अशक्य आहे असे आढळून आले. कारण तेथील बहुतेकांना इंग्रजी फारसे येत नव्हते आणि त्यांचा सर्व व्यवहार जपानी भाषेतून होत होता. हा दाखला देण्याचे कारण इतकेच, की राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत उद्योग आणि व्यापार वाढवावयाचा असल्यास इंग्रजी भाषेचा वापर अपरिहार्य आहे आणि याउलट मराठी भाषा ही एक अडचण होऊन बसेल अशी जी एक समजूत आहे ती चुकीची आहे.

उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रात- म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारात आणि त्यामुळे आपोआपच पर्यायाने विश्वविद्यालयीन वाणिज्य अध्यापनात-मराठी माध्यमाचा वापर करता येणे शक्य आहे का याचे उत्तर होय असेच ठामपणे देता येण्यासारखे आहे. केवळ मराठी भाषेचा आपणांस अभिमान आहे म्हणून होय असे उत्तर आहे असे नव्हे. जिथे जिथे प्रयत्नपूर्वक आर्थिक व्यवहारात आणि विश्वविद्यालयीन वाणिज्य शाखेत मराठीचा आजपर्यंत ज्यांनी वापर केला, त्यांना आपली मराठी भाषा ही त्या दृष्टीने वापर आणि विकास करण्यास अतिशय समृद्ध आहे असे आढळून आले.

**प्र.८** **पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा.** **(१०)**

अ. वाचाल तर वाचाल

ब. विज्ञानाच्या नवलकथा

क. मी शिक्षणमंत्री झाले तर!

ड. ग्रंथालयःनवे तीर्थस्थान